MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक - दिपक थोरात

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०२ | अंक -१४५ | रविवार दि.०९ फेब्रुवारी २०२५ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रु | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -145 | SUNDAY DT.09 FEBRUARY 2025 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4



## फुलसिंगनगर तांडा येथे अंगणवाडीतील बालकांना खिचडीतून विषबाधा

टाकरवन :

टाकरवन ग्रामपंचायत अंतर्गत असलेला फुलसिंग नगर तांडा येथील अंगणवाडीतील बालकांना खिचडीतून विषबाधा झाल्याची घटना समोर आली आहे. बालकावर माजलगाव येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती संबंधित अंगणवाडी अधिकाऱ्याकडून देण्यात आली आहे.शनिवारी सकाळी अंगणवाडीत बालकांना खिचडीचा खाऊ देण्यात आला होता. अशी माहिती संबंधित सूत्रांनी दिली आहे. अंगणवाडीत दिलेली खिचडी दहा बालकांनी खाल्ल्यानंतर त्यांना मळमळ होऊन उलटी आधीचा त्रास सुरू झाला. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन बालकांच्या नातेवाईकांनी त्यांना थेट टाकरवन येतील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये आणले.या ठिकाणावरून त्या बालकांना लगेच जिल्हा रुग्णालय माजलगाव या ठिकाणी हलवण्यात आले. हे अन्न खाल्ल्याने दहा बालकांना विषबाधा झाल्याचा अंदाज वर्तवण्यात येत आहे. या घटनेची माहिती संबंधित तालुका अंगणवाडी अधिकारी तसेच गट शिक्षण अधिकारी यांना माहित होताच त्यांनी थेट रुग्णालय गाठून बालकांच्या तब्येतीची विचारपूस केली.

## परळीतील महादेव मुंडे हत्या प्रकरण

# तपास एसआयटी किंवा सीआयडी कडे द्या, अन्यथा आमरण उपोषण करणार

**बीड - मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर बीड जिल्ह्यातील गुन्हेगारी चव्हाट्यावर आली आहे. दुसरीकडे महादेव मुंडे हत्या प्रकरणाला भाजप आमदार सुरेश धस यांनी वाचा फोडली. आता या प्रकरणी महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांनी पोलिस प्रशासनाला इशारा दिला आहे. या प्रकरणाचा तपास एसआयटी, सीआयडी मार्फत करावा अन्यथा आम्ही कुटुंबीय बीड पोलिस अधीक्षक कार्यालयासमोर आमरण उपोषण करणार, असे ज्ञानेश्वरी मुंडे यांनी म्हटले आहे.**

**महादेव मुंडे यांची १४ महिन्यांपूर्वी हत्या करण्यात आली होती. मात्र, परळी पोलिसांकडून या प्रकरणात कोणतीही कारवाई झाली नसल्याचा खुलासा भाजप आमदार सुरेश धस यांनी केला होता. त्यानंतर महादेव मुंडे हत्या प्रकरणाचा तपास अंबाजोगाईचे पोलिस उपाधीक्षक अनिल चोरमले यांच्याकडे देण्यात आला. मात्र, आता अंबाजोगाईचे पोलिस उपाधीक्षकांकडूनही आम्हाला न्यायची अपेक्षा नाही, असे म्हणत महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांनी या प्रकरणाचा तपास एसआयटी, सीआयडी मार्फत करण्याची मागणी केली आहे.**

नेमके काय म्हणाल्या ज्ञानेश्वरी मुंडे?

महादेव मुंडे यांच्या खून प्रकरणाचा तपास अंबाजोगाईचे पोलिस उपाधीक्षक अनिल चोरमले यांच्याकडे देण्यात आला होता आम्ही त्यांना भेटलो



होतो. मात्र आता त्यांच्याकडून आम्हाला न्यायची अपेक्षा नाही. आम्ही बीड पोलिस अधीक्षकांची भेट घेणार असून त्यानंतर त्यांना ३ दिवसाची मुदत देऊन पोलिस अधीक्षक कार्यालयासमोर आंदोलन करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

आमची एवढीच मागणी आहे एसपी साहेबांना, या प्रकरणात तात्काळ एसआयपी आणि सीआयडी द्या. नाहीतर आम्ही पोलिस अधीक्षक कार्यालयासमोर आमरण उपोषण करू. याआधीही आम्ही डझ साहेबांना भेटलो होतो. तेंव्हा तपास अंबाजोगाई पोलिस उपअधीक्षक अनिल चोरमले यांच्याकडे सोपवण्यात आला नव्हता. त्यांच्याकडे कोणत्याच गोष्टीचा फॉलोअप मिळाला नाही. त्यामुळे या प्रकरणात आम्हाला एसआयटी आणि सीआयडी तपास हवा आहे, अशी मागणी महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडेंनी बीड पोलीस अधीक्षकांकडे केली.

# ऊसतोड कामगार विधवा महिलेची मुलगी झाली महाराष्ट्र पोलीस

## ऊसतोडणीचे काम करत आरती भागवत हिवाळे हिने जिद्दीने यशाला गवसणी घातली

माजलगांव, सुनिल थोरात

पाथरी तालुक्यातील नंदाबाई हिवाळे या ऊसतोड विधवा महिलेच्या मुलीने एक अनोखा इतिहास रचला अत्यंत गरिबी आणि हालाखीच्या परिस्थिती वर मात करत आपल्या आई सोबत ऊसतोडणीचे व मिळेल ते काम करत पोलीस भरतीची परीक्षा दिली व नुकत्याच आलेल्या निकालात महाराष्ट्र पोलीस पोलीस म्हणून बाजी मारली. पाथरी येथील आरती हिवाळे या मुलीने दाखवून दिले की यश जर मिळवायचं असेल तर परिस्थितीच भांडवल न करता संघर्ष करावा लागतो,पेटून उठावे लागते उघड्या डोळ्याने स्वप्ने पहावे लागतात,अशा पद्धतीचा जनु काय आरतीने संदेशच दिला आहे.

लहानपनींच बापाचं छत्र डोक्यावरून हरवलं तरीही आरती खचली नाही विधवा



आईचा संघर्ष पहात मोठी झाली आईने लोकांच्या शेतात काबाड कष्ट केलं विटभट्टीवर काम केलं तीनेही आई बरोबर ही कामे केली पण ते करत असताना शिक्षणावर दुर्लक्ष होऊ दिलं नाही.खरंच आरतीच्या आईच्या कष्टाचं चीज झालं. आरतीचा सार्थ अभिमान वाटतोय कारण आज यशाची व आनंदाची परिसीमा करताच येणार नाही आनंद व यश कोणत्याच मापात मोजता येणार नाही.

ऊसाच्या फडात असताना दिलेल्या पोलीस भरतीची यादी चेक करून त्यात आपला निकाल महाराष्ट्र पोलीस म्हणून आला हे पाहताच आरतीच्या मनात न मावणारा आनंद खूप काही सांगून जातो.आरतीची महाराष्ट्र पोलीस म्हणून मुंबई येथे निवड झाली आहे त्याबद्दल तिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. सर्व स्तरातून तीचे कौतुक केले जात आहे.

# लॉर्ड महावीर इंग्लिश स्कूलच्या चिमुकल्यांनी बनविले रॉकेट मॉडेल

कडा (प्रतिनिधी)

बीड जिल्ह्यामध्ये प्रथमच महावीर इंग्लिश स्कूल कडा यांच्या वतीने आणि इग्नाईटिंग ड्रीम्स ऑफ यंग माईंडस फाउंडेशन यांच्या सहकार्याने जी भारतीय अवकाश संशोधन संस्था (इस्रो) अंतर्गत कार्य करत आहे. मुलांमध्ये कौशल्य क्षमता विकसित करणे,मुलांचा वैज्ञानिक दृष्टीकोन वाढविणे त्याचबरोबर मुलांमध्ये अवकाश विज्ञानाविषयी आवड निर्माण व्हावी याकरिता शनिवार दिनाक ८ फेब्रुवारी २०२५ रोजी एकदिवसीय अंतरीक्ष ज्ञान



अभियान या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांनी श्री.रविशंकर कुमार सर,श्री.रत्नेश सोनी सर आणि श्री.नवीन सर या इस्रो टीमच्या मार्गदर्शनाखाली अगरबत्ती बॉक्स, पोर्टेशियम नायट्रेट, शुगर,चारकोल,पुठ्ठा,चिकट टेप सह इतर वस्तूपासून रॉकेट तयार करून त्यांचे अवकाशात यशस्वी सामूहिक प्रक्षेपण केले.या कार्यशाळेमध्ये एकूण १५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता, यामध्ये एकूण २८ रॉकेट तयार करण्यात आले होते या सर्व रॉकेटने गगन भरारी घेतली.अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात हा कार्यक्रम संपन्न झाला. अश्या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना नव-नवीन गोष्टी शिकायला मिळाल्या याचा आनंद मुलांच्या चेहऱ्यावर दिसून येत होता. सर्वच विद्यार्थ्यांनी खुप मेहनत घेऊन हे रॉकेट बनविले व जेव्हा हे रॉकेट आकाशात उडत होते तेव्हा या विद्यार्थ्यांचा आनंद हि गगनाला भिडल्या सारखा दिसून येत होता.

या आनंदाच्या क्षणांना उपस्थितांच्या टाळ्यांच्या कडकडाटाने विद्यार्थ्यांच्या आनंदाला द्विगुणित केले. या कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष श्री.अमितजी राठोड,उपाध्यक्ष श्री. संदिपजी चानोदिया, सचिव श्री. हेमंतजी मेहेर, कोषाध्यक्ष श्री.डॉ. प्रमोदजी भळगट,श्री.मनिषजी गांधी,श्री. प्रकाशजी श्रीश्रीमाळ, श्री.अमोलजी पटवा, श्री. संजयजी पितळे, श्री संतोषजी गांधी सल्लागार श्री. पी.जी. मेहेर सर, मुख्याध्यापक के.अभिलाष सर उपस्थित होते.

# सिरसदेवी परिसरात अनोळखी व्यक्तीचा मृत्यू देह आढळला

मृत व्यक्तीची ओळख पठविण्याचे तलवाडा पोलिसाचे आव्हान

सिरसदेवी /प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील सिरसदेवी परिसरातील बेंडकी या ठिकाणी एका अनोळखी व्यक्तीचा मृत्यू देह आढळल्याची घटना आज दि ०९ फेब्रुवारी २०२५ रोजी अंदाजे १२ वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली आहे.सविस्तर माहिती अशी कि तालुक्यातील सिरसदेवी परिसरातील जवळच असलेल्या बेंडकी या शिवारात गडी माजलगाव रोड या ठिकाणी हायवे पासून जवळच असलेल्या एका शेतात एका अनोळखी व्यक्तीचा मृत्यू देह येणाऱ्या जाणाऱ्या लोकांनी पाहिला त्या व्यक्तीचे अंदाजे वय ५५ ते ६० च्या आसपास दिसत



आहे.या घटनेची माहिती तलवाडा पोलिसांना मिळताच सिरसदेवी बिट अंमलदार नारायण पिसाळ व नवनाथ डोंगरे घटनास्थळी आले पंचनामा केला तसेच या व्यक्तीची ओळख पठविण्याचे आव्हान तलवाडा पोलिसांनी केले आहे.



# जिल्हाध्यक्ष अण्णासाहेब मतकर यांच्या शेतात महादेव जानकर यांची कार्यकर्त्यांसमवेत हुरडा पार्टी

बीड प्रतिनिधी -

राष्ट्रीय समाज पक्ष जिल्हाध्यक्ष अण्णासाहेब मतकर यांच्या हिरापूर येथील शेतामध्ये हुरडा पार्टी चा आनंद घेताना , साधुसंत येती घरा तोची दिवाळी दसरा या युक्तीप्रमाणे जानकर साहेब हे बीड येथील लग्नाला जात असताना अचानक ह, भ ,प कोळेकर महाराजांचा फोन आला आणि साहेब तुमच्याकडे येत आहेत असे सांगितले अर्ध्या तासांमध्ये सर्व नियोजन करून साहेबांनी हुरडा पार्टीचा आनंद घेतला. मी माझे भाग्य समजतो साहेबांनी आमच्या इथे येऊन हुरडा पार्टीचा आनंद घेतला.साहेबांनी खूप छान गप्पागोष्टी केल्या येणाऱ्या काळातील राष्ट्रीय समाज पक्ष हा सर्व निवडणुका स्वबळावर लढणार आहे आणि सर्व कार्यकर्त्यांना इथून पुढे ताकत साहेबांच्या माध्यमातून मिळणार आहे, त्यामुळे महादेव जानकर साहेब तळागाळातील कार्यकर्त्यांना सोबत घेऊन चालण्याचे काम करत आहेत, त्यांच्या नेतृत्वामध्ये एक दिवस राष्ट्रीय समाज पक्ष हा सत्ताधारी पक्ष असेल, यामागे जानकर साहेबांचे व सर्व कार्यकर्त्यांचा त्याग असेल

सोबत. ह भ प सुरेशानंद महाराज कोळेकर शृंगारूषी गड ,चितळकर साहेब जालना.राष्ट्रीय समाज पक्ष जिल्हाध्यक्ष अण्णासाहेब मतकर . विक्रम बप्पा सोनसळे ह भ प माऊली महाराज सजगणे. ह भ प ओमकार टेहळे महाराज मृदंगाचार्य. ह भ प कैवल्य महाराज. शरद मतकर सचिन ढोणे. अमोल ढोणे. आदी उपस्थित होते

# अंगणवाडी सेविका मदतनिस व्हायचे का ?

## तर मग भरा आपल्या सर्व कागदपत्रासह विहीत मुदतीत अर्ज ! चौदा सेविका व सात मतदनिस रिक्त जागा भरणेकामी कार्यवाही सुरु !

शिरूर कासार(प्रशांत बाफना)

तालुक्यातील एकात्मिक बाल विकास योजना अंतर्गत अंगणवाडी सेविका व मदतनिस यांच्या रिक्त जागा मानधनी मानसेवी पदे भरण्याकरीता शासन निर्णयाची अमंलबजावणी होणार असुन अंगणवाडी सेविका मदतनिस होऊ इच्छिणाऱ्यांनी विहीत मुदतीत व विहित नमुण्यातील माहिती सविस्तर भरून कार्यालयात पोहच करावी करावी लागणार आहे .तालुक्यात चौदा सेविका व सात मदतनिस म्हणून रिक्त पदावर भरती होणार आहे .

झापेवाडी ,मोरजळवाडी ,पिंपळेवाडी ,कान्होबाची वाडी ,सावरगांव च.,रूपुर ,खोलेवाडी ,कमळेश्वर धानोरा ,जांब ,मातोरी ,घोगस पारगांव ,तिंतरवणी १व २ आणि शिनगारवाडी या गावात सेविका पदाची तर बारगजवाडी ,झापेवाडी ,पिपळनेर ,माळेवाडी (भडकेल ) ,कुटे वस्ती आणि बोरगांव या ठिकाणी मदतनिस म्हणून भरती होणार आहे .

विहित नमुन्यातील अर्जासोबत त्यातील सर्व रकाने शैक्षणीक गुण स्वत:चे हस्ताक्षरात भरावेत मदतनिस साठी बारावी उतिर्ण आवश्यक ,वयोमर्यादा १८ ते ३५ वर्ष विधवासाठी कमाल ४० अशी राहिल ,रहिवासी प्रमाणपत्र , कुटूंबाची माहिती ,नियमाप्रमाणे अपत्य यासह सर्व अटी शर्ती बांधील राहणार आहे .उपरोक्त पदासाठी विहित नमुण्यातील परिपूर्ण अर्ज स्वयं साकांक्षीत कागदपत्रासह बाल विकास प्रकल्प अधिकारी ,एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प कार्यालयात दिनांक ५ ते १८ या कालावधीत स्विकारले जातील .उक्त पदासाठी अंतिम निवड शासन निर्णय महिला व बालविकास विभाग मंत्रालय नुसार केली जाणार आहे ,विधवा ,अनाथ ,यांना सुधारीत गुणदान पध्दतीत अतिरिक्त दहा गुण दिले जाणार आहेत .त्यासाठी प्रमाणपत्राची स्वयं



साक्षांकित प्रत अर्जासोबत जोडण्यात यावी ,अन्यथा अतिरिक्त गुण मगळणार नाहीत .नियमाप्रमाणे पारदर्शी पध्दतीने निवड प्रक्रिया होणार असल्याने ईच्छुक उमेदवाराने तृटी ठेऊ नये असे आवाहन बालविकास प्रकल्प अधिकारी सुवर्णा कुलकर्णी यांनी केले आहे .

# अंगणवाडीच्या खिचडीतून विषबाधा; ११ बालकांना मळमळ उलटीचा त्रास

प्रतिनिधी । गेवराई

गेवराई, दि.०९ : माजलगाव तालुक्यातील टाकरवन जवळ असलेल्या फुलसिंग नगर तांडा येथील अंगणवाडीत शनिवारी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास खिचडी खाल्ल्याने ११ बालकांना विषबाधा झाल्याची घटना घडली. या बालकांवर माजलगाव येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार करण्यात येत आहेत. सर्वांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली आहे.



टाकरवन जवळ असलेल्या फुलसिंग नगर तांडा या ठिकाणी असलेल्या अंगणवाडीत २९ बालकी असून त्यापैकी ७ बालके शनिवारी उपस्थित होते. या अंगणवाडीतील मुलांबरोबर शेजारी असलेल्या जिल्हा परिषद शाळेतील काही विद्यार्थी या ठिकाणी खिचडी खाण्यासाठी आले होते. खिचडी खाऊन ही बालके आपापल्या घरी गेली. त्यानंतर दुपारी एक वाजेच्या सुमारास अंगणवाडीतील ७ व ४ जिल्हा परिषद शाळेत शिकणाऱ्या बालकांना अचानक मळमळ व उलटीचा त्रास सुरू झाला. अंगणवाडी सेविका कविता राठोड यांनी सरपंच सुनील तर व उपसरपंच दयानंद बोबडे यांना याची माहिती दिली. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. मधुकर घुबडे यांना माहिती मिळताच त्यांनी तात्काळ रुग्णवाहिका पाठवून बालकांना ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. सर्वांवर उपचार करण्यात आले असून प्रकृती स्थिर असल्याचे डॉ. घुबडे यांनी सांगितले.

अंगणवाडीत शिकणारी श्रावणी नवनाथ राठोड (वय ३ ) संध्या लखन राठोड (वय ५ ), पल्लवी अतुल राठोड (वय ५ ), प्रीतम रवींद्र राठोड (वय ५ ),देवांश अजय राठोड (वय १८ महिने ) रा. फुलसिंग तांडा त्याचबरोबर आर्यन परमेश्वर राठोड (वय ४ ), आरव परमेश्वर राठोड (वय ३ ) रा. टाकरवन येथील बालके आहेत. त्याचबरोबर जिल्हा परिषद शाळेमध्ये शिकणारे अक्षर लहू चव्हाण, देवांश अजय राठोड (वय ३ ) रा. वारोळा , इशिता देविदास धनगाव (वय ७ ), प्रथमेश दिलीप पवार (वय ७) व प्रांजल दिलीप पवार(वय ८ ) हे सर्व रा. फुलसिंग तांडा येथील रहिवासी आहेत.

रात्रभर देखरेख

विषबाधा झालेल्या बालकांची तब्येत स्थिर आहे. रात्रभर डॉक्टरांच्या देखरेखित ठेवण्यात येणार आहे.



## त्यागमूर्ती माता रमाबाई आंबेडकर यांची जयंती उत्साहात संपन्न :-ॲड तेजस वडमारे

बीड प्रतिनिधी

दिनांक ०७/०२/२०२५ रोजी त्यागमूर्ती माता रमाई यांची १२७ वी जंयती बलभीम नगर बुद्धविहार शिवाजीनगर बीड येथे मोठया उल्हासात साजरी करण्यात आली याप्रसंगी मोठ्याप्रमाणात बौद्ध उपासक उपासिका उपस्थित होते, प्रथम आदर्शाची पुजा करुन कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली.आध्यक्ष म्हणून चंद्रामाय जाधव व फुलामाय इंगळे शोभाताई आठवले तर प्रमुख पाहुणे म्हणून आर. पी आय. चे प्रदशाध्यक्ष पप्पूजी कागदे साहेब,जेष्ठ नगर सेवक नर्सिंग नाईकवाडे, नगरसेवक विनोद मुळूक, जिल्हा प्रमुख सचिन मुळूक,निर्भीड जनपत्रकार सुनिलजी डोंगरेसर,अशोक शेजवळ, आसाराम औसरमाल साहेब, कॅप्टन राजाभाऊ आठवले, डी. जी वानखेडेबाबा,प्रशांतजी वासनिक,साहेबराव तरकासे,संजय मिसाळ, महेंद्र वडमारे, प्रमोद शिंदे, चेतन पवार, निखिल सवाई याची उपस्थित होती या कार्यक्रमात निशांत वडमारे या बालकाने माता रमाई यांचे जीवन चरित्र सांगून गीत गायले त्या बद्दल ॲड तेजस वडमारे व साहेबराव तारकसेसाहेबांनी त्यास प्रत्येकी २०० रुपये बक्षीस व जयंती उत्सव समिती कडून एक रमाई मातेचे पुस्तक भेट दिले त्यानंतर .कॅप्टन राजाभाऊ आठवले यानी माता रमाई यांच्या जीवनातील त्याग आणि बलिदाना बद्दल सांगुन त्यानी बाबासाहेबनां कशी खंबीर साथ आणि बाबासाहेब अमेरिकेत होते तेव्हा रमाबाईंनी खूप कठीण दिवस घालवले. रमाबाईंनी या कठीण काळातही कोणतीही तक्रार न करता मोठ्या संयमाने हसून दिवस काढले. डिसेंबर १९४० मध्ये बाबासाहेब डॉ. भीमराव आंबेडकर यांनी थॉट्स ऑफ पाकिस्तान हे पुस्तक लिहिले आणि ते केवळ त्यांची पत्नी रमाबाई रामू यांना समर्पित केले, हे सांगत असताना सर्वांचे डोळे भरून आले, त्यानंतर अंजली तेजस वडमारे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

सरनतय ने कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर दुपारी २ ते ५ पर्यंत भोजनदान करण्यात आले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष सिद्धार्थ वडमारे, उपाध्यक्ष अक्षय जोगदंड, सचिव अजय जाधव, राज जाधव, आर्यन साळवे, नागेश साळवे, अनिल अंकुटे,राजू धनवे संजय धनवे, प्रेम जोगदंड, सुरज वडमारे, शशी गवळी, यश गवळी,नितीन भालेराव निशांत वाघमारे, सनी जाधव सिद्धार्थ साळवे विराज साळवे रितेश साळवे आर्यन खेमाडे यांनी मेहनत घेतली त्याना ड तेजस वडमारे, गौतम खेमाडे, नितीन वाघमारे,बाप्पू खेमाडे, सिद्धार्थ सोनवणे, दिलीप गवळी अंकुश जाधव, निवृत्ती वाघमारे, मंगेश वडमारे, विशाल वडमारे यांनी मार्गदर्शन केले या कार्यक्रमासाठी अंजली वडमारे, सरिता खेमाडे, आशा धनवे, कोमल वाघमारे, सुशीला साळवे, राधा साळवे, हौसाबाई वाघमारे, हेमा वडमारे, उर्मिला वडमारे, सुधा वडमारे, क्रांती धनवे आशा भालेराव, वर्षा खेमाडे, साखराबाई वाघमारे,जयश्री वडमारे,अर्चना जाधव, पद्मिणीबाई वडमारे,शिवकन्या खेमाडे, प्रीती जाधव,रमाबाई सोनवणे,नंदा वडमारे,राणी साळवे शिला साळवे, मंदा वडमारे,किरण वडमारे,सांची वडमारे,हर्षदा साळवे नंदिनी साळवे, जानवी वाघमारे, सानिका जाधव, अदिती धनवे .व परिसरातील सर्व शिव फुले, शाहू आंबेडकर याच्या विचाराचे बांधव मोठया संख्येने उपस्थित होते.

## लोकसहभागाच्या काठीचा आधार घेत सायमा टाकतेय एक-एक पाऊल



### आवाहनाला प्रतिसाद दानशूरांनी १ लाख ३५ हजांची केली मदत

पाटोदा ।प्रतिनिधी

उपचाराअभावी अंपगत्व आलेल्या सायमा बेग हिच्यावर पुणे येथील संचेती हॉटेलमध्ये उपचार सुरू असुन तिच्या प्रकृतीमध्ये चांगला सुधार होत आहे सायमाचे वडील हे सालगडी असुन त्यांची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने योग्य उपचार करू न शकल्याने सायमाला अंपगत्व आले होते.ही गंभीर बाब लक्षात येताच सय्यद शफाउद्दीन तसेच पत्रकार हमीदखान पठाण, जावेद शेख यांनी उपचारासाठी लोकसहभागाचे आवाहन केले असता आवाहनाला चांगला प्रतिसाद मिळत असुन बीड जिल्ह्यासह विविध ठिकाणच्या दानशूरांनी आत्तापर्यंत १ लाख ३५ हजारांची मदत केली असून अजुनही मदतीचा ओघ सुरू आहे.

सायमा ही ९ वर्षांपासून अंथरुणातच असल्याने शरीरावर याचे दुष्परिणाम झाल्याने काही भागावर जखमा झाल्या आहेत त्यामुळे तिच्यावर करण्यात येणाऱ्या उपचाराला बांधा येत असून सध्या त्या जखमावरच उपचार होत असून लवकर जखमां बऱ्या झाल्या नाही तर तेथेही सर्जरी करावी लागणार असल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे.एकुणच लोकसहभागातून मुलीवर उपचार होत असुन लोकही त्याला भरभरून प्रतिसाद देत असल्याने लोकसहभागाच्या काठीचा आधार घेत सायमा एक-एक पाऊल पुढे टाकत आहे..

कुटुंबाला धीर देत उपचाराचा आढावा घेतला

घटनेची गंभीरता पाहुन मा.जि.प.अध्यक्ष सय्यद अब्दुल्ला यांनी सय्यद शफाउद्दीन, पत्रकार जावेद शेख यांच्यासह सायमा बेग कुटुंबाची यांची भेट घेतली तसेच आम्ही सर्व आपल्या सोबत आहोत असा धीर देत संचेती हॉटेलचे प्रमुख मा.डॉ.पराग संचेती यांच्याशी संवाद साधत उपचाराचा आढावा घेतला



स्व.अमोल भैय्या गलधर यांच्या जयंती निमित्त आज आपला परिवार वृद्ध अनाथ आश्रम कळसंबर येथे वृद्धाश्रमातील आजी - आजोबांना अन्नदान व फळे वाटप करण्यात आले आयोजक :- दत्ता शेळके किरण गाडीवान अक्षय नाईकवाडे सुधीर वाणी पवन बन रवी शेळके व स्व. अमोल भैय्या गलधर युवा मंच बीड जिल्हा तर्फे करण्यात आले

## बीड रेल्वे प्रशासनाला उर्द नावाचा विसर का, ?खासदार आमदार याना मागणीचे निवेदन देणार शेख मतीन

बीड( प्रतिनिधी )

बीड येथील रेल्वे प्रशासनाकडून उर्द नावाचा विसरन का नियमाप्रमाणे रेल्वे स्टेशनचे नाव तीन भाषेत असतात मराठी इंग्रजी उर्दू मात्र बीड रेल्वे स्टेशन चं नाव उर्दू भाषेत न केल्याने बीडचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे आमदार संदीप क्षीरसागर मागणीचे निवेदन देणार शेख मतीन मेंबर चखच् युवा जिल्हा अध्यक्ष

रेल्वे स्थानकांच्या नावांचे फलक सामान्यतः हिंदी, इंग्रजी आणि स्थानिक भाषांमध्ये लिहिले जातात. उर्दू ही अनेक राज्यांमध्ये स्थानिक भाषा म्हणून मान्यताप्राप्त आहे, त्यामुळे तेथे रेल्वे स्थानकांच्या फलकांवर उर्दूचा समावेश असतो. बीडमध्ये उर्दू भाषेचा समावेश का करण्यात आलेला नाही, याबाबत नेमकी माहिती उपलब्ध नाही. तथापि, उत्तराखंडमधील डेहराडून स्थानकाच्या नावाच्या फलकावर उर्दूऐवजी संस्कृतचा समावेश केल्याने वाद निर्माण झाला होता, ज्यामुळे प्रशासनाने पुन्हा उर्दूचा समावेश केला . या प्रकरणावरून असे दिसते की स्थानिक भाषांच्या समावेशाबाबत धोरणे आणि निर्णय स्थानिक प्रशासनाच्या धोरणांवर अवलंबून असतात.



आपण आपल्या स्थानिक खासदारांना किंवा रेल्वे प्रशासनाला संपर्क साधून बीड रेल्वे स्थानकाच्या फलकांवर उर्दू भाषेचा समावेश करण्याची विनंती करू शकता. स्थानिक भाषांचा सन्मान आणि समावेश सुनिश्चित करण्यासाठी प्रशासनाला विनंती करणे उपयुक्त ठरू शकते. बीड रेल्वे स्टेशनचा उर्दू भाषेत फलक लावण्यात यावा अशी मागणी शेख मतीन मेंबर -ळचखच् युवा जिल्हा अध्यक्ष यांनी पत्रक द्वारे केली आहे



## मा. एकनाथ शिंदे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त जि. प. प्रा. शाळा खडकी येथे शालेय साहित्य व फळ वाटप कार्यक्रम संपन्न

**वडवणी (जि. बीड)**


**महाराष्ट्र राज्याचे संवेदनशील विद्यमान उपमुख्यमंत्री मा. श्री. एकनाथरावजी शिंदे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मदतीचा हात देण्याच्या उद्देशाने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खडकी (ता. वडवणी) येथे शालेय साहित्य व फळ वाटप कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे आयोजन युवा सेना मराठवाडा निरीक्षक व धर्मवीर प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष बाजीराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. समाजातील गोरगरीब व गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत मिळावी आणि त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.**

कार्यक्रमास शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष बीड जिल्हा प्रमुख महादेव मातकर उपजिल्हा प्रमुख शरद झोडगे, खडकी गावचे सरपंच अशोकभाऊ चोले, शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष वडवणी तालुकाप्रमुख हरिदास करंडे यांनी उपस्थिती लावली. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत शिक्षणाचे महत्त्व स्पष्ट केले व त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद झळकताना दिसला. नव्या वह्या, पेन, पेन्सिली तसेच फळे मिळाल्याने विद्यार्थी आणि पालकांनी समाधान व्यक्त केले. कार्यक्रमात गावातील नागरिकांनीही मोठ्या संख्येने सहभाग घेतला. या वेळी जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक गायकवाड सर, सानप मॅडम, जाधव सर, सावंत सर, वरपे सर यांच्यासह इतर शिक्षक व ग्रामस्थ उपस्थित होते. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल उपस्थित मान्यवरांनी आयोजकांचे कौतुक केले आणि अशा सामाजिक उपक्रमांची गरज असल्याचे मत व्यक्त केले.

## सार्वजनिक शिवजयंती उत्सव लिंबागणेश अध्यक्षपदी अशोक वाणी ; उपाध्यक्षपदी महेश ढवळे

लिंबागणेश :

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील ग्रामपंचायत कार्यालयात दि. ८ फेब्रुवारी शनिवार रोजी सरपंच बालासाहेब जाधव यांच्या अध्यक्षतेखाली व उपसरपंच बाळकृष्ण थोरात,सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ, डॉ . गणेश ढवळे, विक्रांत वाणी, संतोष भोसले, सुरेश निर्मळ,बाळकृष्ण मुळे,शंकर वाणी, पप्पू आवसरे ग्रामपंचायत सदस्य दामोदर थोरात,अक्षय वाणी, अशोक जाधव, , समीर शेख, रमेश गायकवाड,यांच्या उपस्थितीत प्रतिवर्षी प्रमाणे सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती २०२५ गठीत



करण्यात आली यावेळी नवनिर्वाचित समितीमध्ये अध्यक्षपदी अशोक वाणी, उपाध्यक्ष महेश ढवळे, सचिव सौरभ जाधव, सहसचिव दिनेश जाधव, कोषाध्यक्ष अशोक जाधव, सल्लागारपदी तुकाराम गायकवाड,वसीम शेख यांची तर सदस्यपदी महावीर वाणी, अभिजित गायकवाड, महावीर जाधव,औदुंबर नाईकवाडे,अभय वनवे, नितीन जाधव, सुभाष वाणी,बाबु शिंदे, ओंकार तागड, विक्की भोसले,अक्षय येडे ,अक्षय ढवळे, विजय आगवान,अमर आबदार, स्वप्निल वक्ते यांची निवड करण्यात आली.प्रास्ताविकात सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ यांनी मागील संपूर्ण वर्षभरात शिवजयंती उत्सव समितीकडुन झालेल्या कार्यक्रमांची संक्षिप्त स्वरूपात माहिती देत शिवजयंती उत्सवाची रूपरेषा आणि उत्सवाला अभिप्रेत असणा-या बाबी मांडल्या. डॉ.गणेश ढवळे यांनी गतवर्षी प्रमाणेच डीजेमुक्त शिवजयंती साजरी करत विविध पारंपरिक सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करून कायदा व सुव्यवस्था अबाधित राखुन पोलिस प्रशासनाला सहकार्य करत आदर्शवत शिवजयंती साजरी करण्याचे आवाहन केले.





# सरपंचाने गाव केले पाणीदार

**जयराम नाईक तांडा (तर्फे पाचेगाव) ता. गेवराई, जि. बीड हे सुमारे ३०० घरांचे गाव. लोकसंख्या सुमारे १६००. बहुसंख्य बंजारा समाजाचे. प्रत्येकी किमान एक हेक्टर शेती आहे, परंतु पाणी नसल्याने मजुरी हेच त्यांच्या उपजीविकेचे साधन. सुमारे २५० कुटुंबे ही ऊस तोड कामगार म्हणून पुणे, कोल्हापूर आणि गुलबर्गा (कर्नाटक) येथे जातात.**

२०१५ पासून ऊस तोड कामगार म्हणून जाणाऱ्यांची संख्या दरवर्षी तीस ते चाळीस कुटुंबाने वाढतच होती. येथील स्थानिक भाषेत सुमारे २५० कोयते मंजुरीला जातात. हे बहुतेक सर्व जण तरुण तिशीतील. घरी मुलांना सांभाळण्याची सोय नसेल तर मुलांसह स्थलांतर. मुलांचे शिक्षण आणि आरोग्याची परवड.या गावाचे युवा सरपंच विष्णू राठोड यांनी आपल्या गावाच्या गरजा ओळखताना पाणी हेच गावाच्या प्रगतीसाठी शस्त्र आहे हे जाणले. गावाची भौगोलिक स्थिती जाणून घेतली. गावाच्या उत्तरेला मोठ्या जलग्रहण क्षेत्रातून येणाऱ्या पाण्याच्या साठवणुकीचा एक तलाव सुमारे पन्नास वर्षांपूर्वी बांधलेला होता.परंतु राज्यातील इतर तलावाप्रमाणे याही तलावाची अवस्था गंभीर होती.



सांडवा तुटलेला, गाळाने तलाव भरलेला आणि तलावातील पाण्याची गळती होती. तलावाचा पुढचा ओढा गाळाने भरल्याने जमिनीला समतल झालेला होता. या तलावाची क्षमता सुमारे दोन कोटी लिटर पाणी साठवण्याची आहे.



गावशिवाराचा भाग साधारणपणे साडेसहाशे ते साडेसातशे मिलिमीटर एवढ्या पर्जन्यवृष्टीचा आहे. मागील दहा वर्षांमध्ये सुमारे चार ते पाच वर्षे ही सरासरीपेक्षा अधिकच्या पर्जन्याची आहे. या सर्व बाबींचा विचार करून त्यांनी यावर काम करण्याचे निश्चित केले. डॉ. सुमंत पांडे आणि त्यांच्या गटाने गाव सगळा अभ्यास केला.संपूर्ण परिसराची ड्रोनच्या माध्यमातून अभ्यास केला. लोकांच्या बैठका घेतल्या आणि परिस्थिती नीट आकलन करून कामाची दिशा ठरवली.२०२३ च्या मे महिन्यामध्ये नभांगण फाउंडेशनाच्या आर्थिक सहकार्याने सुमारे दीड महिना लोकसहभागाने जलसंधारणाची कामे केली.

त्याचा परिणाम गावातील सुमारे ६० विहिरीतील पाणीसाठा वाढला. या संपूर्ण वर्षभर या विहिरीतील पाणीसाठा वाढला. कोरड्या कूपनलिकांना पाणी आले. आज ओढ्याकाठच्या दोन्ही बाजूंच्या सुमारे दोनशे एकर जमिनीवर दोन पिके घेतली जातात.बाजरी, ज्वारी, तूर, मूग, उडीद यांसारखे पारंपरिक पिके आहेतच, तसेच बरेच शेतकरी आता रेशीम शेतीकडे वळले आहेत. आता संपूर्ण गाव समन्यायी पद्धतीने सिंचनाखाली आणण्याचा संकल्प गावकऱ्यांनी केला आहे.



# आर्वीतील बोगस जलजीवन योजनेची चौकशी करा, अन्यथा आत्मदहन

प्रतिनिधी ।शिरूर कासार

प्रत्येक घरातील नागरिकांना पाणी उपलब्ध व्हावे या उद्देशाने केंद्र शासनाने हर घर जल या योजनेअंतर्गत जलजीवन मिशन योजनेची अंमलबजावणी केली या योजनेमधून आर्वी गावाला अडीच कोटी रुपयांची पाणीपुरवठा योजना महाविकास आघाडीच्या सरकारमध्ये मंजूर झाली असून योजना अद्यापही ५०% अपूर्ण असल्याने गावातील ग्रामपंचायत सदस्यासह युवक या योजने संदर्भात आक्रमक झालेले असून त्यांनी प्रशासनाला आत्मदहनाचा इशारा दिलेला आहे.

आर्वी गावामध्ये प्रशासनाकडून यापूर्वी राबवल्या गेलेल्या पाणीपुरवठा योजना सपशेल अपयशी ठरल्याने ग्रामस्थ पाण्यासाठी तर असलेले आहेत यामुळे नव्याने मंजूर झालेली जलजीवन पाणीपुरवठा योजना ग्रामस्थांसाठी संजीवनी ठरणारी आहे परंतु मंजूर योजना सुरुवातीपासूनच वादाच्या भोवऱ्यात सापडलेली आहे लोकप्रतिनिधीच्या निकटवर्तीय गुत्तेदाराला हे काम मिळाले असल्याने योजनेत कुठल्याही प्रकारची बोगसगिरी केली जाणार नसल्याचे अभिवचन लोकप्रतिनिधी संदीप क्षीरसागर यांनी ग्रामस्थांना दिले होते परंतु संबंधित गुत्तेदाराकडून योजना पूर्णत्वासाठी मोठा अवधी घेतला जात असून आत्तापर्यंत योजनेचे केवळ ५० टक्के काम पूर्ण झालेले आहे यामध्ये भुसारे वस्ती साळवे वस्ती जाधव वस्ती भोकरे वस्ती या ठिकाणी अद्यापही पाईपलाईनचे काम झालेले नाही यामुळे गावातील ग्रामपंचायत सदस्य गोपाल भुसारे, अरुण देवकते,बळीराम मंडलिक, शेख रज्जाक, रामेश्वर नागरगोजे व आयुब शेख हे आक्रमक झाले असून योजनेचे काम गुणवत्ता पूर्ण व्हावे यासाठी त्यांनी प्रशासनाला निवेदन दिलेले असून यामध्ये एक महिन्याच्या कालावधीमध्ये हे काम पूर्ण करून घेण्यात यावे अशी मागणी करण्यात आली असून एक महिन्यानंतर एक एप्रिल रोजी सामूहिक आत्मदहनाचा इशारा निवेदनात दिलेला आहे.पौडूळ तलाव क्षेत्रातून आर्वी गावाच्या जलजीवन पाणीपुरवठा योजनेसाठी पाईपलाईनने पाणी आणलेले असून गुत्तेदाराकडून पाईपलाईनचे पाणी टाकीत सोडण्यासाठी वन विभागाने अटकाव घातल्यामुळे व पाणी फिल्टर साठी जागा उपलब्ध होत नसल्यामुळे थेट पाईपलाईनचे पाणी गावातील नळांना जोडून सध्या पाणीपुरवठा केला जात आहे परंतु कुठे आहे तर कुठे नाही अशी अवस्था जल जीवन योजनेची झालेली आहे.




# मा. एकनाथ शिंदे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त जि. प. प्रा. शाळा खडकी येथे शालेय साहित्य व फळ वाटप कार्यक्रम संपन्न

वडवणी ।प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे संवेदनशील विद्यमान उपमुख्यमंत्री मा. श्री. एकनाथरावजी शिंदे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मदतीचा हात देण्याच्या उद्देशाने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खडकी (ता. वडवणी) येथे शालेय साहित्य व फळ वाटप कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे आयोजन युवा सेना मराठवाडा निरीक्षक व धर्मवीर प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष बाजीराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. समाजातील गोरगरीब व गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत मिळावी आणि त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमास शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष बीड जिल्हा प्रमुख महादेव मातकर , उपजिल्हा प्रमुख शरद झोडगे, खडकी गावचे सरपंच अशोकभाऊ चोले, शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष वडवणी तालुकाप्रमुख हरिदास करंडे यांनी उपस्थिती लावली. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत शिक्षणाचे महत्त्व स्पष्ट केले व त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद झळकताना दिसला. नव्या वह्या, पेन, पेन्सिली तसेच फळे मिळाल्याने विद्यार्थी आणि पालकांनी समाधान व्यक्त केले. कार्यक्रमात गावातील नागरिकांनीही मोठ्या संख्येने सहभाग घेतला. या वेळी जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक गायकवाड सर, सानप मॅडम, जाधव सर, सावंत सर, वरपे सर यांच्यासह इतर शिक्षक व ग्रामस्थ उपस्थित होते. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल उपस्थित मान्यवरांनी आयोजकांचे कौतुक केले आणि अशा सामाजिक उपक्रमांची गरज असल्याचे मत व्यक्त केले.

# १० फेब्रुवारी : जागतिक कडधान्य दिन ; संतुलित आरोग्याची गुरुकिल्ली म्हणजे डाळी

दरवर्षी १० फेब्रुवारीला जागतिक कडधान्य दिन साजरा केला जातो . हा दिवस साजरा करण्यामागचा उद्देश लोकांना डाळींच महत्त्व पटवून देण आणि पोषण आणि अन्नसुरक्षेसाठी कडधान्ये किती महत्त्वाची आहेत , हे सांगण हा आहे . जागतिक कडधान्य दिन साजरा करण्यामागचा इतिहास आपण जाणून घेऊया . ' जागतिक कडधान्य दिन ' पहिल्यांदा २०१६ मध्ये साजरा करण्यात आला , नंतर संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने १० फेब्रुवारी हा जागतिक कडधान्य दिन म्हणून साजरा करण्याचा ठराव मंजूर केला . तेव्हापासून हा दिवस ' जागतिक कडधान्य दिन ' म्हणून साजरा केला जातो .

या वर्षीच्या जागतिक कडधान्य दिनाचा कडधान्य : कृषी अन्न प्रणालींमध्ये विविधता आणणे हा थीम असेल .आजच्या जीवनशैलीत लोक फास्ट फूड आणि फ्रोझन फूडला जास्त महत्त्व देत आहेत . त्यामुळे आपल्या आहारात डाळींचा वापर कमी होत आहे . त्यामुळे शरीराला पूर्ण पोषण मिळत नसून त्याचे दुष्परिणाम लोकांच्या विशेषत: लहान मुल व तरुणांच्या आरोग्यावर होत आहेत . लोकांच्या आरोग्यासाठी आणि अन्नसुरक्षेसाठी डाळी किती महत्त्वाच्या आहेत , ही बाब लोकांपर्यंत पोहोचावी आणि डाळींचा आहारात समावेश करण्यासाठी जनजागृती व्हावी , या उद्देशाने जागतिक कडधान्य दिन साजरा केला जातो .

द्विदल धान्यांना म्हणजेच ज्या धान्यांपासून डाळी तयार होतात , त्यांना कडधान्य म्हणतात . मूग , उडीद , तूर , हरभरा , मसूर , राजमा , वाटाणा , कुळिथ यांसारख्या अनेक प्रकारच्या कडधान्यांच उत्पादन भारतात घेतल जात . हे प्रथिनांचे मुख्य स्त्रोत आहेत .

देशाच्या ग्रामीण आणि शहरी भागात , १९९९-२००० या वर्षात कडधान्ये / डाळींचा मासिक दरडोई वापर अनुक्रमे ०.८१ आणि ०.९६ किलोग्रम इतका होता . त्यात २०११-१२ मध्ये घसरण होऊन तो अनुक्रमे ०.७४ आणि ०.८६ किलोग्रॅम इतका झाला . खर तर सद्यस्थितीत भारत हा कडधान्ये / डाळींचा जगातील सर्वात मोठा उत्पादक आणि ग्राहक देश आहे . परंतु देशांतर्गत मागणी पूर्ण करण्यासाठी भारतातले उत्पादन अपुरे असल्याने त्याची आयात करणे भाग पडते आहे . अलीकडच्या काळात देशातली कडधान्ये / डाळींची मागणी सातत्याने वाढली आहे . या पार्श्वभूमीवर देशांतर्गत मागणी पूर्ण करण्यासाठी सरकारने कडधान्ये / डाळींचे उत्पादन वाढावे यासाठी अनेक उपाययोजना हाती घेतल्या . त्यामुळे २०१४-१५ पासून आयातीचे प्रमाणही सातत्याने कमी होऊ लागले आहे . भारतात दरवर्षी सुमारे २५.४६ दशलक्ष टन इतके कडधान्य / डाळींचे उत्पादन होते .

डाळीच्या धान्याची बहुतेक सर्व पिके इतिहासपूर्व कालापासून लागवडीखाली आहेत . त्यांचे बी भरडल्यास त्याच्यावरील टरफल निघून जाऊन प्रत्येक दाण्याच्या दोन - दोन डाळिंब्या ( दळे ) होत असल्यामुळे त्यांना डाळीची धान्ये ( द्विदल धान्ये ) म्हणतात . कडधान्यात उडीद , कुळीथ ,घेवडा , चवळी , तूर , वाल , वाटाणा , मटकी , मूग , सोयाबीन , हरभरा इत्यादींचा समावेश होतो .

कडधान्ये बहुतेक सर्व प्रकारच्या जमिनीत येतात . परंतु चांगल्या प्रकारच्या जमिनीवरील पिकाचे उत्पन्न जास्त येते . हंगाम जातीपरत्वे खरीप , रब्बी किंवा उन्हाळी असतो . बियांच्या आकारमानाप्रमाणे हेक्टरमध्ये ४०-९० किग्रॅ बी दोन ओळींमध्ये सुमारे ४५ सेमी अंतर ठेवून मिश्रपीक किंवा स्वतंत्र पीक म्हणून पेरतात . साधारणत: पेरल्यापासून ९० ते १२० दिवसांत पीक तयार होते . शेंगा पक्क होऊन त्यांच्यामधील बी कडक झाल्यावर झाडे बुंध्याजवळ विळ्याने कापून खळ्यावर वाळवून मळणी करतात .

बियांचे आकार व रंग निरनिराळे असतात . बियांत २१-२५ टक्के प्रथिन , ५८-६४ टक्के कार्बोहायड्रेट , १.५ टक्के वसा (फॅट्स ) आणि कॅल्शियम , फॉस्फोरिक आम्ल व ब १ जीवनसत्त्वही पुष्कळ असते .

मनुष्याच्या रोजच्या पिष्टमय अन्नात चौरस आहाराच्या दृष्टीने जरूरीची असलेली शाकीय ( वनस्पतिजन्य ) प्रथिने डाळीतून भरपूर मिळतात . त्यामुळे



मानवाच्या आहारात डाळी फार महत्त्वाच्या समजतात . आहारात कडधान्याचे वाळलेले किंवा ओले दाणे आणि कोवळ्या शेंगांचाही उपयोग करतात . यांच्या मुळ्यावरील गाठींतील सूक्ष्मजंतू हवेतील मुक्त नत्र जमिनीत स्थिर करतात . त्यामुळे जमिनीची उत्पादनक्षमता वाढते म्हणून तृणधान्याच्या पिकात द्विदलाची मिश्रपिके घेतात . काही जाती हिरवळीच्या खतासाठी वापरतात . त्यांच्यापासून गुरांना वैरण मिळते .

डाळी हे प्रथिनांचे ( प्रोटीन ) प्रमुख स्त्रोत असून सर्व प्रकारच्या लोकांमध्ये डाळी हा भारतीय आहाराचा अविभाज्य भाग घटक आहे आणि कर्बोदकांमधे समृद्ध आहाराला आवश्यक प्रोटीन पुरवतो . डाळींचे उत्पादन जगात भारताचे सर्वात जास्त आहे . डाळीच्या वजनापैकी २० ते २५ टक्के प्रथिने आहे , जे गव्हाच्या प्रथिने पदार्थाच्या दुप्पट आहे आणि तांदूळापेक्षा तीनपट आहे .

कडधान्याची पोषकता : कडधान्य ही प्रथिनांनी समृद्ध असतात . १०० ग्रॅम कडधान्यामध्ये १७ ते २५ टक्क्यापर्यंत प्रथिने असतात . याला अपवाद म्हणजे सोयाबीन . यामध्ये प्रथिनांचे प्रमाण ४० ते ४२ टक्के असते . शाकाहारी लोकांच्या आहारामध्ये प्रथिनांची पूर्तता प्रामुख्याने कडधान्यातूनच होते .

भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद (आय सी एम आर ) यांनी दिलेल्या संकेताप्रमाणे एका वर्षांत प्रती माणसी कमीत कमी १७ ते २५ किलो कडधान्य वापरणे आवश्यक आहे .

मोड न आलेल्या कडधान्यामध्ये तीन अपोषक द्रव्ये असतात . ती म्हणजे टॅनीन , फायटीक सीड आणि ट्रिप्सीन इनहीबीटर . टॅनीनमुळे लोहाच्या शोषणास अडथळा निर्माण होतो आणि फायटीक आम्लामुळे चुण्याचे शोषण कमी होते . ट्रिप्सीन इनहीबीटरमुळे ट्रिप्सीन नावाच्या विकरे (एन्झाइम) निर्मितीमध्ये अडथळा येतो . त्यामुळे कडधान्याचे पचन नीट होत नाही . म्हणून मूग , चवळी , उडीद , हरभरा , कडवा वाल व पावटा हे पचायला सर्वात कठीण असतात .

कडधान्य रात्रभर भिजत ठेवल्यास त्यातील टॅनीन आणि फायटीक सीड चे प्रमाण कमी होते . कडधान्य चांगली शिजवली तर ट्रिप्सीन इनहिबीटरचा नाश होतो . आपल्याकडे ( महाराष्ट्र ) कडधान्यांना भिजवून मोड आणून खाण्याची एक जुनी परंपरा आहे . त्यामुळे काही विशिष्ट विकरे (एन्झाइम) उत्तेजित होतात .

मोड आलेल्या कडधान्याचे फायदे : मोड येण्यापूर्वी कडधान्यामध्ये ' क ' जीवनसत्त्व हे प्रति १०० ग्रॅम २ ते ६ मिलीग्रॅम असते . हेच प्रमाण मोड काढल्यानंतर २७ ते ५२ मिलीग्रॅम पर्यंत वाढते . मोड आणल्यामुळे कडधान्यांचा वातुळपणा कमी होतो .

मोड येण्याच्या प्रक्रियेत टरफलांमध्ये असलेले टॅनीन आणि फायटीक सीड यांचे निरुपद्रवी द्रव्यात रुपांतर होते . त्यामुळे लोहाचे आणि चुन्याचे शोषण वाढते . याचा शरीराला चांगला फायदा होतो . मोड आणण्याच्या प्रक्रियेमध्ये कडधान्य हलके होतात आणि पचायला सुलभ होतात . मोड आलेली कडधान्ये सुकवून ठेवता येतात . अशा सुकविलेल्या मोडामध्ये कार्बोदकाचे आणि ' क ' जीवनसत्वे मोठ्या प्रमाणावर वाढते . मोड आणण्याच्या प्रक्रियेमध्ये प्रथिने आणि कर्बोदकाची पाचकता लक्षणीय प्रमाणात वाढते . अशा मोड असलेल्या कडधान्यांचा दैनंदिन आहारातील समावेश म्हणजेच आरोग्याची गुरुकिल्ली . मोड आलेली कडधान्य मानवाच्या शरीराला अतिशय महत्त्वाची व गुणकारी असतात .शरीराची झीज भरून काढण्यासाठी आणि पाचकता वाढविण्यासाठी मोड आलेली कडधान्य आवश्यक असतात .

केंद्र व राज्य सरकारच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे भारत कडधान्यांबाबत / डाळींबाबत 'आत्मनिर्भरते'च्या अगदी समीप पोहचला आहे . अशावेळी शाश्वतता आणि योग्य आहाराची गरज या दोन्ही बाबींच्या दृष्टीन सूक्ष्मपोषणमुल्यांचा भूरभूर समावेश असलेल्या कडधान्य / डाळींच सेवन महत्वाच आणि लाभदायक आहे , याबाबत नागरीकांमध्ये जागरूकता वाढवणं अधिक महत्वाचं ठरणार आहे .

चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके ,
तहसीलदार , बीड

# परळीत होणार पशुवैद्यकीय महाविद्यालय ना. पंकजाताई मुंडे यांचे पशुसंवर्धन खात्याला आदेश

**पशुविज्ञान विद्यापीठाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची टीम उद्या परळीत येऊन करणार जागेची पाहणी**

बीड।दिनांक ०८।

**राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी परळीत शासकीय पशू वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याचे आदेश पशुसंवर्धन विभागाला दिले आहेत.**



**महाविद्यालयांसाठी लागणाऱ्या जागेची पाहणी करण्यासाठी पशू विज्ञान विद्यापीठाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची टीम उद्या परळीत दाखल होत आहे, लवकरच या कामाला गती येणार आहे.**

राज्यात परळी वैजनाथ आणि बारामती या दोन ठिकाणी नवीन शासकीय पशू वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याची घोषणा ना. पंकजाताई मुंडे व उप मुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत बारामती येथे नुकत्याच झालेल्या एका कार्यक्रमात करण्यात आली होती. त्या अनुषंगाने या दोन्ही ठिकाणी महाविद्यालय स्थापन करण्याकरिता मुलभूत सोयीसुविधांचे निरीक्षण व भारतीय पशू चिकित्सा परिषद नवी दिल्ली यांचे मानकानुसार आवश्यक असलेल्या बाबींच्या अनुषंगाने विद्यापीठ स्तरिय निरीक्षण समिती गठीत करण्यात आली असून या समितीचे अध्यक्ष तथा पशू विज्ञान विद्यापीठाचे डीन डॉ. एस व्ही. उपाध्ये, डॉ. जी. एस. खांडेकर, कनिष्ठ अभियंता डॉ. पी.व्ही. तायडे, तांत्रिक अधिकारी डॉ पी. इ. ताकसांडे हे उद्या जागेची पाहणी करण्यासाठी येणार आहेत.

बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक तसेच सर्व संबधित अधिकारी यावेळी उपस्थित राहणार आहेत.ना. पंकजाताईंनी घेतला आढावा शुक्रवारी जिल्हाधिकारी कार्यालयात ना. पंकजाताई मुंडे यांनी पर्यावरणा सोबतच परळीत होणाऱ्या नवीन शासकीय पशू वैद्यकीय महाविद्यालयाच्या जागेचा आढावा घेतला होता. अधिकाऱ्यांच्या टीम कडून जागेचा निर्णय घेतला येणार आहे, त्यानुसार उद्याची पाहणी होत आहे.

सायं. दैनिक महाराष्ट्र आरंभ

रविवार दि.०९ फेब्रुवारी २०२५
SUNDAY DT.09 FEBRUARY 2025



# मौलाना आझाद महामंडळातील शैक्षणिक कर्जामध्ये जामीनदाराची अट रद्द करा

## संचालक शेख तय्यब यांची अल्पसंख्यांक मंत्र्यांसह अध्यक्ष सचिवांसोबत चर्चा

**प्रतिनिधी ।** मुंबई

राज्य शासनाने स्थापन केलेल्या विविध महामंडळांचा हेतू त्या त्या समाजातील सर्वसामान्यातील सर्वसामान्य व्यक्तींना सामाजिक, आर्थिक, शैक्षणिकदृष्ट्या सदृढ बनवणे होय. परंतु अनेक वेळा काही जाचक अटींमुळे हा हेतू साध्य होताना दिसून येत नाही. अल्पसंख्यांक समाजासाठी उभारलेल्या मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळामार्फत दिल्या जाणार्या शैक्षणिक कर्जाबाबतही मालमत्ताधारक व नोकरदार जामीनदाराची अट असल्याने विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज घेताना अडचणी येत आहेत. ती अडचण पाहून महामंडळाचे संचालक तथा साय. दैनिक बीड रिपोर्टरचे संपादक शेख तय्यब यांनी सदरची अट रद्द करण्यात यावी याबाबत अल्पसंख्याक मंत्री दत्तात्रय भरणे मामा, अध्यक्ष मुश्ताक अंतुले, सचिव रुचेश जयवंशी, उपसचिव विशाखा आढाव व व्यवस्थापकीय संचालक ग.पि. मकदूम या सर्वांसोबत चर्चा करत विद्यार्थ्यांच्या अडचणी समजावून सांगितल्या व निवेदनाद्वारे संबंधित अट रद्द करण्याची मागणी केली.

मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे संचालक शेख तय्यब यांनी गेल्या चार महिन्यांच्या कालखंडात क्रियाशील होत सर्वप्रथम मराठवाड्याचा आणि नंतर विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, खानदेशाचा दौरा करून तेथील अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाच्या कार्यालयात भेटी देत तिथल्या अडीअडचणी समजून घेण्याबरोबर लोकांची कामे करण्याबाबतच्या सूचना दिल्या होत्या. या दौर्यात राज्यभरातील अल्पसंख्याक समाजातल्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक कर्जाबाबत काही अडचणी शेख तय्यब यांच्या कानावर घातल्या. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना शेख तय्यब यांना शैक्षणिक कर्जातली प्रमुख अडचण उमजून आली. अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थी जेव्हा शैक्षणिक कर्ज घेण्यासाठी अर्ज करतात तेव्हा कर्ज मंजुरीसाठी दोन जामीनदारांची गरज



असते. त्यामध्ये प्रामुख्याने एक मालमत्ता ज्याच्याकडे आहे तो आणि दुसरा नोकरदार, गोरगरीब विद्यार्थ्यांना हे दोन्ही जामीनदार मिळत नाहीत. जामीन देण्यासाठी त्यांच्याकडे मालमत्ता नसते अशा वेळी ते शैक्षणिक कर्जापासून वंचित राहतात. परिणामी विद्यार्थी हुशार, कर्तृत्ववान असताना केवळ आर्थिक परिस्थितीमुळे त्याला पुढील शिक्षण घेता येत नाही. या सर्व बाबी उमजून घेत संचालक शेख तय्यब यांनी काल थेट अल्पसंख्यांक मंत्री दत्तात्रय भरणे मामा व मुश्ताक अंतुले यांची भेट घेत शैक्षणिक कर्जाबाबत सविस्तर चर्चा करून विद्यार्थ्यांच्या अडचणी त्यांच्या समोर मांडत शैक्षणिक कर्ज योजनेसाठी लागणारी मालमत्ता धारक व नोकरदार जामीनदाराची अट रद्द करण्याची मागणी केली. त्या आशयाचे निवेदन मंत्री महोदयांबरोबर सचीव रुचेश जयवंशी, उपसचिव विशाखा आढाव, व्यवस्थापकीय संचालक ग.पि. मकदूम यांनाही दिल्या असून त्यांच्या सोबतही चर्चा करण्यात आली आहे. या सर्वांनी निवेदनाचा सकारात्मक विचार करू, असे आश्वासन दिले आहे.

---

## ओमशांती ज्युनिअर कॉलेज शहापूर येथील इयत्ता १२ वी च्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहात संपन्न

**प्रतिनिधी ।** ताडहादगांव




ओमशांती कनिष्ठ महाविद्यालयात मुख्याध्यापक श्री ना-हेडा एन.जी यांच्या अध्यक्षतेखाली निरोप समारंभ मोठया उत्साहात संपन्न झाला असून कार्यक्रमाची सुरुवात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दिप प्रज्वलनाने झाली असून सुंदर आवाजात विद्यार्थीनीने स्वागत गीत सादर केले. इयत्ता ११ वी च्या विद्यार्थ्यांच्या वतीने मान्यवरांचे पुष्पगुछ देऊन सत्कार करण्यात आला. विद्यार्थी व शिक्षकांनी दोन वर्षातील आठवनीना उजाळा दिला. प्रमुख मार्गदर्शक म्हणून सेवानिवृत्त मु. अ.श्री अशोक यादव यांनी मौलीक विचार मांडले.शालेय समितीचे अध्यक्ष श्री प्रल्हाद शिंदे,श्री देवकते उपस्थित होते.उत्कृष्ट संचालन श्री.तांदळे व्ही.एस, श्री खरात एस. बी यांनी केले.सर्वांचे आभार श्री देवकर एस. एस यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगिताने झाली.कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी भाडाळकर आर. वाय,आवारे डी.जे, श्री पिठोरे जे. एन, बांड डी. डी, खरात एस. ए, जाधव पी. सी, जाधव वाय. के, काकडे एस. बी, चव्हाण सी. एन, चौधरी आर. के, पाईकराव वाय.पी, सौ ढेरे एस.एस यांनी परीश्रम घेतले शेवटी विद्यार्थ्यांनी स्वादिष्ट भोजनाचा आस्वाद घेतला.

---

# विद्यार्थ्यांनी कठोर परीश्रमातुन शिक्षण क्षेत्रात यश संपादन करा-राजेंद्र वैद्य

## ज्ञानसागग विद्यालयात इयत्ता १० वी १२ वी विद्यार्थ्यांना निरोप

**प्रतिनिधी ।** जाफ्राबाद

**शिक्षण क्षेत्रात मोठी स्पर्धा निर्माण झाली आहे.या स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी विद्यार्थ्यांनी मनामध्ये परीस्थीतीची कुठलीच खंत न बाळगता नजरे समोर ध्येय चिकाटी तसेच कठोर मेहनतीच्या जोरावर शिक्षण क्षेत्रात यश संपादन करुन आपली ओळखा निर्माण करावी असे प्रतिपादन गुरुदेव सेवा मंडळाचे प्रचारक राजेंद्र वैद्य यांनी जाफ्राबाद येथे बोलतानी केले.**

ज्ञानसागर माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयात इयत्ता १० वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांच्या अयोजीत निरोप समारंभ कार्यक्रमा प्रसंगी श्री.राजेंद्र वैद्य हे बोलत होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक निवृत्ती



दिवटे,प्रा.राजेंद्र वैद्य,डाँ.संदिप ढसाळ,प्राचार्य व्ही.एस.नवले,प्राचार्य एस.ए.पवार,बी.डी.कोल्हे,प्रशांत अंभोरे,सुजीत सोनोने,श्रीकृष्ण वानखेडे,रमेश शेळके,पांडुरंग राऊत आदीची व्यासपीठावर उपस्थीती होती. यावेळी पुढे बोलताना श्री.राजेंद्र वैद्य म्हणाले की,प्रत्येक व्यक्ती अथवा विद्यार्थी हा कुठल्याना कुठल्या क्षेत्रात परांगत असतो.म्हणुन विद्यार्थ्यांनी स्वताःला ओळखा आणी आपल्या आवडीच्या क्षेत्रात यश संपादन करा.ज्ञानाची गंगा आयुष्यात कधीच आटत नाही.परंतु आपण किती ज्ञान आत्मसात करुन अचारणात आणतो हे महत्वाचे आहे.कष्टा विना कधीच मिळत नाही.करीता विद्यार्थ्यांनी आपल्या ध्येयप्राप्ती पर्यत कठोर परीश्रम करुन यश संपादन करावे.असे आहवान यावेळी श्री.राजेंद्र वैद्य यांनी केले.

तर विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांचा आदर्श नजरे समोर ठेवुन जीवनामध्ये वाटचाल करावी.तसेच टेंन्शन घेतल्याने आयुष्य बदलत नाही.त्या करीता कठोर परीश्रम मेहनत करावी लागते असे.वैद्यकीय आधीकारी डाँ,संदीप ढसाळ यांनी सांगीतले.तर मुख्याध्यापक निवृत्ती दिवटे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करुन पुढील परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या.यावेळी शहादेव ईलग,कैलास चिंचोले,गजानन वायाळ,बाबासाहेब दिवटे,निवृत्ती वायाळ,रमेश शेळके,आप्पासाहेब सपाटे,भगवान शिराळे,आनंता कळंबे,उज्वला वायाळ,सुनिता भोसले,दिपाली बन्सवाल,मजुषा आत्राम,उर्मिला पंडीत,ललीता रोडगे,रमेश उखर्डे,भरत शेळके,सतिश फदाट,अमर मकवाणी,योगेश बकाल,भगवान शिराळे,दिनेश बरडे,अजीत म्हस्के,गणेश बकाल,दिलीप काळे,संजय जोशी,संतोष शिंदे,दिलीप माळी,यांच्यासह शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थीत होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कु.खुशी दुबे हिने केले. तर सुत्रसंचालन कु.अनुजा जोशी कु.ऋतुजा तर प्राचार्य व्हि.एस.नवले यांनी आभार मानले.ज्ञानसागर विद्यालयात इयत्ता१०.वी व १२ वी निरोप समारंभा प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना प्रा.राजेंद्र वैद्य व व्यासपीठावर मान्यवर

---

## रावसाहेब पाटील दानवे कॉलेज फार्मसीची कार्यकारणी घोषित

**प्रतिनिधी ।** बदनापुर

शैक्षणिक वर्ष २०२४ - २५ ची बदनापूर येथिल रावसाहेब पाटील दानवे कॉलेज ऑफ फार्मसी ची कार्यकारणी घोषणा करण्यात आली यावेळी कॉलेज अध्यक्ष म्हणून रोहीत कंगले तर कॉलेज मंत्री नकुल गोडसे यांची घोषणा करण्यात आली यावेळी जालना जिल्हा संयोजक नवनाथ गव्हाणे बदनापूर शहर सहमंत्री अनिकेत इंगळे , फार्मा व्हीजन संयोजक अभिराज तांभुरे , जयेश रनबावळे व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

---

## समाज कल्याण वस्तीगृह प्रमुख अजित शेजूळ याची निवड

**प्रतिनिधी ।** बदनापुर

शैक्षणिक वर्ष २०२४ - २५ ची बदनापूर येथील समाज कल्याण मुलांचे शासकीय वसतिगृह येथील वसतिगृह समिती घोषणा करण्यात आली. यावेळी वसतिगृह प्रमुख म्हणून अजित शेजुळ, सह प्रमुख कार्तिक गायके, सहप्रमुख पंकज नागरे, अभ्यासमंडळ प्रमुख समाधान जाधव तर सदस्य म्हणून कुलदीप खरात यांची घोषणा करण्यात आली. यावेळी बदनापूर शहर कार्यकारिणी सदस्य जयेश रणबावळे उपस्थित होते.



---

# जुगार अड्ड्यावर धाड; जुगारी फरार, लाखोंचा ऐवज जप्त

**प्रतिनिधी ।** परळी

परळी तालुक्यातील धर्मापुरी येथील बस स्थानक रोडवर एका इमारतीमध्ये मोबाईलवर ऑनलाईन कल्याण मुंबई नावाचा जुगार चालू असल्याची खबर पोलिसांना मिळाली. यावरून परळी ग्रामीण पोलिसांच्या एका पथकाने शुक्रवारी रात्रीच्या सुमारास या जुगार अड्ड्यावर छापा टाकला. मात्र, पोलीस आल्याची चाहूल लागल्याने जुगारी पाठीमागील दरवाजातून पसार झाले. तेवढ्यात समोरील दरवाजातून पोलिस दाखल झाले. जुगारी हाती लागले नाही, पण पोलिसांनी यावेळी तीन लाख २३ हजार रुपये ८० रुपये किमतीचे जुगार साहित्य व रोख रक्कम जप्त केली आहे. याप्रकरणी परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात ८ फेब्रुवारी रोजी पहाटे जगन्नाथ फड, शिवाजी पांचाळ, अक्षय सावंत (राहणार धर्मापुरी) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शनिवारी दुपारपर्यंत यातील एकाही आरोपीस अटक करण्यात आली नव्हती.

परळी तालुक्यातील धर्मापुरी येथील बस स्थानकाजवळ एका इमारतीमध्ये मुंबई कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेलविला जात असल्याची खबर पोलिसांना मिळाली. त्यावरून परळी ग्रामीण पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अनमोल केदार पोलीस उपनिरीक्षक रियाज शेखलाल, निमोणे व पोलीस हेड कॉन्स्टेबल पांडुरंग वाले, पोलीस कर्मचारी चेमटे व इतर कर्मचाऱ्यांनी सात फेब्रुवारी रात्री सव्वानऊ वाजेच्या सुमारास जुगार अड्ड्यावर छापा टाकला. मात्र, पोलीस पथक आल्याचे समजताच जुगार चालक आणि जुगारी पाठीमागील दरवाज्यातून उड्या टाकून पळून गेले. त्यामुळे एकही आरोपी पोलिसांच्या हाती लागला नाही.

---

## वाळू माफियांचा महसूल पथकावर हल्ला अंधाधुंद दगडफेक

### मंडळ अधिकारी पी.डी.शिंदे यांना जब्बर मारहाण त्यांचा खांदा झालाय फ्रॅक्चर

**प्रतिनिधी ।** घनसावंगी

घनसावंगी तालुक्याच्या हद्दीत मौजे दैठणा बुद्रुक शिवारात मंडळ अधिकारी श्री पी.डी.शिंदे यांच्या पथकाने रात्री गौण खनिज प्रतिबंधक कारवाई करत असताना त्यांनी हायवा पकडला त्याच वेळी वाळू माफियांनी पथकावर जोरदार हल्ला केला.व अंधाधुंद दगडफेक केली या हल्ल्यामध्ये मंडळ अधिकारी श्री पी.डी.शिंदे यांच्या डाव्या खांद्याच्या हाडाला दगड लागल्याने डावा खांदा फ्रॅक्चर झाला आहे.त्यांचा उपचार संजीवनी हॉस्पिटल अंबड येथे सुरु आहे.या पथकामध्ये श्री पी.डी.शिंदे मंडळ अधिकारी अंतरवाली टेंभी,श्री एन.पी.बाळापूरे मंडळ अधिकारी राणी उंचेगाव,श्री विजय बुचरे,श्री नारायण येवतीवाड,श्री तुषार दळवी,श्री अमोल बांडे,श्री संतोष सुपेकर,श्री भारत बारसे कर्मचारी होते. यात वाळू माफिया कडून अनेकदा महसूल



पथकावर हल्ले झालेले असून प्रशासनाने यांच्यावर कडक कार्यवाही करावी, जे वाळू माफिया दोषी असतील त्यांच्यावर कठोरातील कठोर शिक्षा करावी अशी मागणी परिसरातील नागरिकांतून उपस्थित होत आहे

---

# शेतकऱ्यांसाठी दिवसा पूर्णवेळ वीज उपलब्ध करू: आमदार सुरेश धस

## बिबट्याच्या हल्ल्यात मृत झालेल्या महिलेच्या कुटुंबास मदत, जखमीवर उपचार करू

**प्रतिनिधी ।** पाटोदा

पाटोदा तालुक्यातील मेंगडेवाडी येथील शेतकरी महिलेचा बिबट्याने जिव घेतला. तर कारेगाव येथील येथील युवक बिबट्याच्या हल्ल्यात जखमी झाला आहे. यातील मयत सोजराबाई धोंडीराम बोबडे यांच्या कुटूंबास शासन तिन दिवसात पाच लाख रुपयाची राखे मदत करेल व विस लाख रुपये ठेव बचत करेल. अशी ग्वाही आमदार सुरेश धस यांनी दिली असून शेतकऱ्यांना दिवसा पुर्णवेळ विद्युत पुरवठा शासन करेल. या संदर्भात महावितरणच्या अधिकाऱ्यांना सुचना देणार आहे असेही ते म्हणाले.

गुरुवार (६ फेब्रुवारी) रोजी सायंकाळी आमदार सुरेश धस यांनी पाटोदा ग्रामीण रुग्णालयात जावून सोजराबाई धोंडीराम बोबडे यांच्या मृतदेहाची पाहणी केली. मेंगडेवाडी येथे जाऊन बोबडे कुटूंबीयांचे सांत्वन केले. दरम्यान त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला, ते म्हणाले की, वनविभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांशी बोलणे झाले आहे. बिबट्याला मारण्याची थेट परवानगी नसली तरी देखील येत्या दोन ते तीन दिवसात या बिबट्याला जेरबंद

मेंगडेवाडी या ठिकाणी बिबट्याच्या हल्यात मृत्यूमुखी पडलेल्या बोबडे कुटुंबीयांची भेट घेऊन आमदार सुरेश धस यांनी सांत्वन केले. पाटोदा ग्रामीण रुग्णालयात माध्यमांशी संवाद साधताना आमदार सुरेश धस.

करण्यासाठी आवश्यक ती यंत्रणा आम्ही उभी करणार आहोत. आष्टी या ठिकाणी काही पिंजरे देखील आहेत. यामधील तज्ञ लोकांशी बोलून बिबट्या नक्कीच दोन दिवसात जेरबंद होईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. सध्या सुगीचे दिवस आहेत व शेतीला पाणी देण्यासाठी देखील शेतकरी रात्री शेतात



जातात शेतकऱ्यांनी एकट्याने शेतात न जाता समूहाने जावे. त्याचप्रमाणे मोबाईल टॉर्च व मोठ्या आवाजात गाणे लावून शेतात काम करावे. जेणेकरून बिबट्याचा वावर त्या ठिकाणी होणार नाही अशा पद्धतीने सर्वांनी काळजी घ्यावी. आपण स्वतः महावितरणच्या अधिकाऱ्यांशी लगेचच बोलणार असून शेतकऱ्यांना दिवसापूर्ण वेळ शेतीसाठी वीज उपलब्ध करून देण्यासाठी पूर्ण प्रयत्न करू असे आमदार सुरेश धस यांनी यावेळी सांगितले.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT